**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT II -2023-24**

**GRADE: VIII** | **MARKS : 100**
**SUBJECT: MARATHI** | **TIME : 3 HRS**

विभाग -अ (गद्य- पद्य)

**प्र.१.अ) खालील पठीत गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे उत्तरातून शोधून लिहा.** (७)

मला खेळायला मात्र आवडायचे आणि बॅडमिंटनची आवड मला लहान वयातच लागली होती. निरनिराळे चषक व ढाली घेतलेले माझे कितीतरी फोटो तुम्ही पाहिले आहेत ना? सातत्याने परिश्रम करूनच मी विजेता खेळाडू होऊ शकलो. आंतरराष्ट्रीय सामन्यात आपल्या देशाचे मी प्रतिनिधित्व केले,मला अर्जुन पुरस्कार मिळाला.

तुम्ही कोणता ना कोणता खेळ खेळलाच पाहिजे, मग तो क्रिकेट, टेनिस, बॅडमिंटन असा तुम्हांला जो कोणता आवडत असेल तो खेळ असू दे. खेळ खेळण्यामुळे आपल्या आयुष्यात शिस्त येते. कोणत्याही प्रसंगाचा सामना कसा करायचा, अगदी हरावे लागले तरी कसे हरायचे, ते खेळ आपल्याला शिकवतात, जिंकलो तर जिंकण्याचा आनंदही मिळवून देतात तसेच प्रत्येकाने दररोज थोडा व्यायाम केलाच पाहिजे

प्र.१) एका शब्दात उत्तर लिहा. (३)

१) आपल्या देशाचे मी प्रतिनिधित्व या सामन्यात केले_____

२) आयुष्याला शिस्त कशामुळे मिळते- _____

३) लेखकाला मिळालेला पुरस्कार_____

प्र.२) एका वाक्यात उत्तर लिहा. (१)

१) लेखकाला कशाची आवड लहान वयातच लागली?

प्र.३) आकृती पूर्ण करा. (२)

१) खेळामुळे होणारे फायदे

१) [ ]

२) [ ]

३) [ ]

४) [ ]

प्र.४) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा (१)

१) निरनिराळे ____ व ___ घेतलेले माझे कितीतरी फोटो तुम्ही पाहिले आहेत ना?

२) तुम्ही कोणता ना कोणता ____ खेळलाच पाहिजे

**प्र.१.ब) खालील पाठीत गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे उताऱ्यातून शोधून लिहा.** (७)

प्रवास बंदिस्त गाडीत सुक्याने करण्यात जितकी मजा असते त्याहीपेक्षा जास्त दोन चाकीवर अंग भिजवत करण्यात असते. पावसाचं पाणी अंगावर घेत आणि रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांच्या अंगावर उडवत, वारा छातीवर झेलत, आवडती गाणी गुणगुणत पावसाळी प्रवास करण्यातली मजा तर काही औरच असते. असा शरीर गारठवणारा आणि मनाला उभारी देणारा प्रवास कधी संपूच नये असे वाटते; पण पाहता पाहता मैलांचे दगड मागे पडत जातात आणि आपण येऊन पोहोचतो ते वरंधा घाटात. घाटात घाट वरंधा घाट, बाकी सब घाटीयाँ! असे इथे आल्यावर वाटते. पाण्यावर झुकलेल्या हिरव्यागच्च

झाडीतून रोरावत बाहेर येणारे धबधबे, दरीतलं हिरवं रान, ढगाळलेले डोंगर, पावसाची संततधार, मोठमोठ्या दगडांवर आसूड मारत धावत खळाळत वाहणारे पाणी, असे निसर्गाचे विहंगम दृश्य डोळ्यांसमोर येते अन् नजरेचे पारणे फेडून जाते. त्या पावसाळी वातावरणात भजी-वडे-चहा असा चमचमीत मेनू मजबूत चापायला वरंधा घाटातल्या टपऱ्यांसारखी दुसरी जागा नाही. श्री वाघजाईच्या सोबतीने उभारलेल्या टपऱ्यांमधून हा राजेशाही खाना अगदी ताजा ताजा तयार - केला जातो. गरमागरम कांदाभजी, आलं लसूण घालून तळलेला गरमागरम बटाटेवडा आणि सोबत वाफाळलेला चहा.

प्र.१) आकृती पूर्ण करा. (२)

१) वरंधा घाटातील प्रवासाची मजा-

१. ☐

२. ☐

३. ☐

४. ☐

प्र.२) एका वाक्यात उत्तर लिहा. (१)

१) वरंधा घाटाची कोणती दोन वैशिष्ट्ये सांगा?

प्र.३) रिकाम्या जागा भरा. (२)

१) आलं लसूण घालून तळलेला गरमागरम ____

२) ____आणि मनाला उभारी देणारा प्रवास कधी संपू नये असे वाटते.

प्र.४) एका शब्दात उत्तर लिहा .

१) नजरेचे पारणे फेडणारे दृश्य कोणाचे ____

२) टपऱ्यांमधून तयार केला जाणारा ____

**प्र.२.अ. खालील पठित पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे पद्यातून शोधून लिहा** **(७)**

हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

भव्य पटांगण, बाग मनोहर फुला-पाखरांचे जग सुंदर,
आपुलकीचा सुवास पसरे मनामनांतून इथे निरंतर.
गुरुजनांची अमूल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

पायाभरणी अस्तित्वाची प्रयोगशाळा व्यक्तित्वाची,
तन सुदृढ, मन विशाल होई इथे रुजवणूक त्या तत्त्वांची.
विचारधारा तीच वाहते नसानसांत, रगारगांत,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

नवीन स्वप्ने, नवीन आशा ही प्रगतीची नवपरिभाषा,
परिश्रमाने, अभ्यासाने उन्नत बनवू आपुल्या देशा.
मिटवून सारे भेद चला रे मानवतेच्या युगात,
कलागुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.

प्र.१) एका शब्दात उत्तर लिहा. (२)

१)सुंदर जग कोणाचे______

२)पसरणारा सुवास______

प्र.२) एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

१)प्रगतीची नव परिभाषा कोणती?

२)आपुलकीचा सुवास कुठे पसरतो?

प्र.३) खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा. (२)

१)_________ तीच वाहते नसानसात ,रगारगात

________________________ ही प्रतिभेची प्रभात.

प्र.४) खालील अर्थाचे शब्द कवितेतून शोधून लिहा (१)

१) मैदान -_______२) सतत-_______

**प्र.२.ब. खालील पठित पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे पद्यातून शोधून लिहा** **(७)**

आभाळाची अम्ही लेकरे, काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही ।।

श्रमगंगेच्या तीरावरती कष्टकऱ्यांची अमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हा गाव वेगळा नाही ।।

इमान आम्हा एकच ठावे घाम गाळुनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा स्वर्ग वेगळा नाही ।।

माणुसकीचे अभंग नाते अम्हीच अमुचे भाग्यविधाते
पंथ वेगळा नाही आम्हा संत वेगळा नाही ।

कोटि कोटि हे बळकट बाहू जगन्नाथ-रथ ओढुन नेऊ
आस वेगळी नाही आम्हा ध्यास वेगळा नाही

प्र.१) एका शब्दात उत्तर लिहा. (३)

१) कष्टकऱ्यांची वस्ती कोठे -________

२) अभंग नाते कशाचे- _________

३) कोटी कोटी हातांनी हे ओढणार आहे______

प्र.२) कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधून लिहा. (२)

१) नाते - २) ठावे-

प्र.३) एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

१) कष्टकऱ्यांची आई कोण आहे?

२) आभाळाची आम्ही लेकरे या कवितेचे कवी कोण?

**प्र.३.अ.) खालील अपाठीत गद्य वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(७)**

मराठी भाषा दिवस (जागतिक मराठी भाषा दिवस) हा जगभरातील मराठी भाषकांकडून दर वर्षी २७ फेब्रुवारीला साजरा केला जातो. मराठी कवी विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने हा दिवस 'मराठी भाषा दिवस' म्हणून पाळण्याची प्रथा सुरू झाली. जागतिक मराठी अकादमीने या कामी पुढाकार घेतला. भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा हि समस्त मराठीजनाची मागणी आहे. इये मराठीच्या नगरी ब्रह्म विद्येचा सुकाळू करी, अशा शब्दांतून श्री ज्ञानदेवानी मराठीचा उल्लेख करता करता ब्रम्हविध्या म्हंटले आहे, शब्दवाही म्हटले आहे. याची यथार्थता आज मराठी भाषा गौरव दिनी प्रकर्षाने पटते। अमृतातेही पैजासी जिंकणाऱ्या या माय मराठीचा मला सार्थ अभिमान वाटतो. हा दिन नाशिकच्या कवी कुसुमाग्रजांचा वाढदिवस आहे. त्यांचा हा जन्म दिन मराठी भाषा दिन पाळला जातो.

प्र.१) एका शब्दात उत्तरे लिहा. (२)

१)२७ फेब्रुवारी या दिवशी साजरा केला जातो_____

२) मराठी भाषेसाठी काम करणारी संस्था______

प्र.२) एका वाक्यात उत्तर लिहा. (२)

१) लेखकाला कशाचा अभिमान वाटतो

२) ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेचा उल्लेख कसा केला आहे.

प्र.३) समानार्थी शब्द उताऱ्यातून शोधून लिहा. (२)

१) सन्मान- २) गर्व-

प्र.४) रिकामी जागा भरा. (१)

१) हा दिन _____ कवी कुसुमाग्रजांचा वाढदिवस आहे.

**प्र.३.ब) खालील अपठित पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(७)**

आनंदी-आनंद गडे !
इकडे, तिकडे, चोहिकडे
वरती खाली मोद भरे;
वायुसंगे मोद फिरे,

नभात भरला,
दिशांत फिरला,
जगात उरला,
मोद विहरतो चोहिकडे;
आनंदी-आनंद गडे !

सूर्यकिरण सोनेरी है
कौमुदि ही हसते आहे
खुलली संध्या प्रेमाने,
आनंदे गाते गाणे:
मेघ रंगले, चित्त दंगले,
गान स्फुरले,
इकडे, तिकडे, चोहिकडे
आनंदी-आनंद गडे !

प्र.१) एका शब्दात उत्तर लिहा. (३)

१) प्रेमाने खुलली आहे [ ]

२) गाणे कसे गायले जाते [ ]

३) हसणारी कोण आहे [ ]

प्र.२) कवितेच्या ओळी पूर्ण करा (२)

______ भरला, _____ फिरला,

______ उरला,

______ विहरतो चोहिकडे;

आनंदी-आनंद गडे !

प्र.३) समानार्थी शब्द लिहा (१)

१. मेघ- २. गान-

प्र.४.) पुढील विरुद्धार्थी शब्दाचे उत्तर कवितेतून शोधून लिहा. (१)

दु:ख ×

**प्र.३.क) खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा. (१२)**

१) आपण सगळे शरीरुपी राज्याचे सेवक आहोत या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

२) तुमच्या इच्छा तीव्र असतील तर साधनांशिवाय साधना करता येते या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ लिहा.

३) व्यायामाचे महत्त्व तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

४) वरंधा घाटाचे विहंगम दृश्य तुमच्या शब्दात लिहा.

५) तन सुदृढ आणि मन विशाल या शब्दसमूहाचा तुम्हाला कळलेला अर्थ लिहा.

## विभाग- ब (व्याकरण)

**प्र ४. सूचनेनुसार कृती करा.** (२०)

१) खालील अवयवांचा वापर करून अर्थपूर्ण वाक्य तयार करा. (२)

१) शाब्बास! २) सावकाश

२) खालील वाक्य वाचून वाक्याचा प्रकार ओळखा. (२)

१)गुरूजींनी जीवनाचा मार्ग दाखवला आणि मी तो स्वीकारला.

२)बरेच काम करूनही त्याला थकवा आला नाही.

३) खालील वाक्यातील अव्यय ओळखा (२)

१) देवळाजवळ एक इमारत आहे.

२)ठीक! मी सहा वाजता स्टेशनवर येईल

४) कंसातील दिलेल्या शब्दांचे वर्गीकरण तक्त्यामध्ये करा. (२)

(नदी,आहेत,आपण,त्यांनी,व, आणि)

नाम- सर्वनाम- क्रियापद-

५) खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करा. (२)

१) ठीक तुमची तयारी काय आहे

२) अमित म्हणाला डोंगरावर चढणे सोपे नाही.

६) समानार्थी शब्द लिहा. (२)

१) पूजा - २) वास -

७) विरुद्धार्थी शब्द लिहा. (२)

१)उजाडणे ×    २) जास्त ×

८) वचन बदला. (२)

१) चेहरे -    २) वाटा -

९) खालीलपैकी कोणत्याही एक वाक्यप्रचाराचा अर्थ ओळखून वाक्यात उपयोग करा. (२)

१) नजरेचे पारणे फेटणे    २) किरकिर करणे

१0) अचूक शब्द ओळखा. (२)

१) स्वावलंबि\ स्वमलंबी\ स्वावलंबी\स्वावालंबि

२) डाबरी \डांबरी \डावरी\ डाबंरि

## विभाग क (लेखन विभाग)

**प्र.५.अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लेखन करा.** (८)

१) आपली संपर्क माध्यमे

२) मी मंत्री झालो तर

**प्र.५.ब) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा.** (६)

१) मुंबई - पुणे प्रवास करतांना आपली राहिलेली बॅगेची चौकशी करण्यासाठी पुणे बस परिवहन आगार ,पुणे यांच्या संचालकांना चौकशी पत्र लिहा.

२) आपल्या परिसरात फुटबॉलचे मैदान उपलब्ध करून देण्याबाबत परिसरातील रस्ते बांधकाम विभाग अधिकाऱ्यांना विनंती पत्र लिहा.

**प्र.६.अ) खालील शीर्षकावर अर्थपूर्ण कथा लिहा व तात्पर्य लिहा** (६)

१) स्वावलंबी हेच जीवन

**प्र.६.ब) खालील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.** (६)

१) 'कार विकायची आहे' या विषयाची आकर्षक जाहिरात करा.